# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

'वनभवन', रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर.४४०००१

माहिती अधिकार/-रजि.पो.

क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.१२५(१८-१९)/२१७५

नागपूर ४४० ००१, दिनांक १८-१२-२०१८

प्रति,

श्री.उमेश पांडुरंग बावणे,
प्लांट नं.५३६, चिटनिस नगर
उमरेड रोड,नागपूर २२००२४

**विषय :-** माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ नियम-३ अन्वये केलेला अर्ज.
१.वनरक्षक वनपालांचे कर्तव्यात बदल करण्याबाबत गठीत केलेल्या समीतीचे आदेश.
२.समीतीने सादर केलेला अहवालाची साक्षांकित प्रत.
३. अहवालावर घेतलेला निर्णय याची साक्षांकित प्रत.

**संदर्भ:-** १. आपला दिनांक २९/११/२०१८ रोजीचे अर्ज.
२. कक्ष अधिकारी कक्ष-७(२)/मा.अ.अ. ०५/प्र.क्र.१/भाग-५/३३७ (१८-१९) दि.०१/१२/२०१८ रोजीचे पत्र.

विषयांकित प्रकरणी आपला दिनांक २९/११/२०१८ रोजीचा अर्ज, कक्ष अधिकारी कक्ष-७ (२) यांचे कडिल पत्र दिनांक ०१/१२/२०१८ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला आहे.सदर माहिती अधिकार अर्जात आपण नमूद केलेली माहिती यासोबत जोडून पाठविण्यांत येत आहे. सदर माहितीचे एकूण ७ पान आहेत ते आपणांस विनामुल्य पुरविण्यात येत आहे.

सदर प्रकरणी आपला अर्ज निकाली काढण्यात येत असून प्राप्त माहितीवर आपले काही आक्षेप असल्यास त्या विरूध्द आपण खाली नमूद पत्त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कडे अपील करू शकता.

श्री.मुकुल त्रिवेदी
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन),
" बी- विंग " दुसरा मजला वनभवन रामगिरी रोड सिव्हील लाईन्स नागपूर -०१

सहपत्र :-वरील प्रमाणे

(नितीन झाडे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कक्ष-१०
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

**प्रतिलिपी :-** कक्ष अधिकारी कक्ष-७, (२) यांना त्यांचे कडिल पत्र क्रमांक ३३७, दि.१/१२/२०१८ रोजीच्या अनुषंगाने माहिती करिता.



Scanned by CamScanner

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.८७(१६-१७)/२५२९

नागपूर-४४० ००१ दिनांक १९-३-२०१८

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),

महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :** महाराष्ट्र फॉरेस्ट मॅन्युअल (MFM) Vol.I मधील प्रकरण २ मधील मुद्दा क्र. २.०५.०५ मध्ये दिलेल्या वनरक्षकाचे कर्तव्यात सुधारणा करणेबाबत

**संदर्भ :** या कार्यालयाचे आदेश क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.८७(१६-१७)/२२७३, दिनांक १७/०२/२०१८.

वनरक्षक व वनपालांची कर्तव्ये ही महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-I) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये दिलेली आहेत. त्यामध्ये सुधारणा करणेस्तव शिफारस करणेसाठी संदर्भित आदेशान्वये समिती गठीत केली होती. सदर समितीची बैठक दिनांक ०५/०३/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांचे दालनात घेण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे समितीने आपला अहवाल सादर केला असून सदर अहवालाची प्रत माहितीकरीता यासोबत सादर करण्यात येत आहे.

सहपत्र :- समितीचा अहवाल

(डी.डी. गुजेला)
मुख्य वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर तथा
सदस्य सचिव

प्रतिलिपी :-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य.
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर तथा सदस्य
४) वन अभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर

(डी.डी. गुजेला)
मुख्य वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर तथा
सदस्य सचिव

जन माहिती अधिकारी
तथा
कक्ष अधिकारी कक्ष-१०



Scanned by CamScanner

# महाराष्ट्र वन संहिता (MFM) व्हॉल्यूम-I मधील प्रकरण २ मधील दिलेल्या वनरक्षक व वनपालाचे कर्तव्यात सुधारणाबाबत शिफारस करण्याकरीता गठीत केलेल्या समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तात व समितीचा अहवाल

वनरक्षक व वनपालांची कर्तव्ये ही महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-I) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये दिलेली आहेत. तथापी बदलत्या काळानुसार वनरक्षक व वनपालांचे कामात बराच बदल झाला असून त्यानुसार त्यांचे कर्तव्यात सुधारणा प्रस्तावित करण्यासाठी मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे आदेश क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.८७(१६-१७)/२२७३, दिनांक १७/०२/२०१८ अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांचे अध्यतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत केली आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ. पी. श्रीवास्तव<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | अध्यक्ष |
| २ | श्री. ए.आर. मंडे,<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर | : | सदस्य |
| ३ | श्री. संजीव गौड<br>मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर | : | सदस्य |
| ४ | श्री. ए.एच. भगत<br>वन अभियंता, नागपूर | : | सदस्य |
| ५ | श्री. डी.डी. गुजेला<br>मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन), नागपूर | : | सदस्य सचिव |

२. उक्त समितीची बैठक दिनांक ०५/०३/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात आली. सदर बैठकीत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर वगळता सर्व सदस्य उपस्थित होते.

३. समितीचे सदस्य सचिव यांनी वनरक्षक, वनपालांची कर्तव्ये ही महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-I) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये खालीलप्रमाणे दिलेली असल्याचे सर्व उपस्थितांचे निदर्शनास आणून दिले.

**वनपाल :-**

(i) Round Officer's duties include protection of forests, investigation of offences, issue of transit and other passes, collection of grazing fees, and marking of trees in coupes and inspection of forests.

वन माहिती अधिकारी
६३
कक्ष अधिकारी कक्ष-१०



Scanned by CamScanner

(ii) He is responsible for all works in his round. He should instruct the Beat Guards about all their duties, and see that they know their forest boundaries, write their diaries and explain to them the forest rules, regulations, rights and privileges applicable to the local villagers etc. The duties in respect of the beat guards / forest guards are also equally applicable to foresters / round officers. The duties of RFO as they relate to forester are also applicable to Round Officers and Foresters

**वनरक्षक :-**

He should

(i) patrol and protect all forests in his beat;

(ii) repair and maintain forest boundary marks in accordance with orders on the subject;

(iii) see that the rights and privileges existing if any in the forests are not abused by the villagers;

(iv) prevent illicit cutting of trees by constantly moving around the beat;

(v) see the cattle do not enter in closed areas; if they are habitual or accidentally strayed, warn the owner to be more careful in future; if not properly cared for by their owner, and allowed to pick up a subsistence by pilfering food or if deliberately driven into such areas, impound them;

(vi) see that whenever prescribed, fees are paid for grazing in open areas;

(vii) frequently inspect the fire stations or climb tall places to look out for fires in the fire season, maintain fire lines in good time, as per orders in this behalf; collect villagers and put out forest fire promptly in the event of their occurrence and prevent kindling of fire or leaving it burning upon public or prevent ways wherever this is prohibited.

(viii) detect and report illicit shooting and fishing in reserved forests;

(ix) see that forest produce is not removed except in accordance with the transit rules under the Forest Act;

(x) collect timber found adrift, beached or sunk;

(xi) carry out silvicultural works as sowing seeds, preparing nurseries, collecting seeds, planting and carrying out other cultural operations as ordered. Cut creepers and make petty repairs to plantation and nursery fences without special orders.

(xii) keep the forest rest house in his charge together with the compound in clean and tidy condition and generally protect them from damage; and

(xiii) submit first offense report immediately on discovery of a forest offense, try to trace the offender and, if found, take him to the Round Officer promptly and give necessary help to the Round Officer in conducting the enquiry.

सदर कर्तव्य ही पूर्वीच्या बॉम्बे फॉरेस्ट म्यॅन्युअल, भाग-१ मधील प्रकरण २ मधून घेतलेली आहे. वरील कामाव्यतिरिक्त आधुनिक काळामध्ये त्यांचे कामाचे स्वरूपात झालेले बदल जसे की,

(१) PDA वापरून वनगुन्हयाची ऑनलाईन नोंद करणे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी कक्ष-१०

(२) PDA, GPS वापरून रोपवन व इतर कामांचे पॉलीगॉन बनविणे. कामाचे संनियंत्रण करणे.

(३) PDA च्या मदतीने fire alerts प्राप्त करून अग्निप्रतिबंधक कामे करणे व सदर कामाचे संनियंत्रण करणे.

(४) GPS, MSTRIPES सारखी ॲनरॉईड ॲप वापरून रोपवन, वनसंरक्षण, वन्यप्राण्यांचे व अधिवासाचे संनियंत्रण करणे.

(५) Camera Trap तंत्रज्ञान वापरून वन्यप्राण्यांचे संनियंत्रण करणे.

(६) मानव व वन्यप्राणी संघर्ष हाताळणे.

(७) वनक्षेत्रा जवळील भागामध्ये मोठया प्रमाणावर मानव वन्यप्राणी संघर्षाच्या घटना घडताना कायदा व सुव्यवस्था राखणे. Rapid Rescue Operation हाती घेणे, वन्यप्राण्यांना बंदीस्त करणे व radio collar लावलेल्या वाघाचा मागोवा करून संनियंत्रण करणे, आधुनिक तंत्रज्ञान हाताळुन वन्यप्राण्यांचे संनियंत्रण करणे.

(८) संयुक्त वनव्यवस्थापन/ इको विकास अंतर्गत शासनाचे नवीन धोरणानुसार लोकसहभागातून वनविकास व इतर विकास कामे करून वनालगतचे गावांमध्ये लोकसहभागातून वनसंवर्धन करणे.

(९) JFM व परिस्थितीकीय विकास समितीच्या माध्यमातून शास्त्रोक्त पध्दतीने सुक्ष्म आराखडा तयार करणे, नियोजन करणे गावस्तरावर वेगवेगळी कामे, रोजगार निर्मितीची कामे करणे.

(१०) शासनाच्या नविन योजनानुसार वेगवेगळी कामे हाती घेणे-जसे की, जलयुक्त शिवार, Peoples Biodiversity Register तयार करणे, १०० टक्के L.P.G. पुरविणे ई.

(११) ग्रामवन समिती,संयुक्त वनव्यवस्थापन समिती, इको विकास समिती, जैवविविधता समिती यांचेकडे प्राप्त होणारे निधीचे सर्व लेखा पाहणे, त्याचे ऑडीट, हिशेब ठेवणे ई.

डिसेंबर-२०१७ चे सुमारास काही वनरक्षक वनपालांना पीडीए / स्मार्टफोनचा वापर करणे हे त्यांचे कर्तव्याचा भाग नसल्याचे नमुद करुन ते वापरण्यास नकार दिला होता, ही बाब सदस्य सचिवांनी निदर्शनास आणून दिली. त्यामुळे खालीलप्रमाणे वनरक्षकाचे कर्तव्यांबाबत महाराष्ट्र फॉरेस्ट मॅन्यूअल, भाग-१ मधील प्रकरण २ मधील मुद्दा क्र. २.०५.०५ मध्ये बाब क्र. (xiii) नंतर खालीलप्रमाणे सुधारणा करणेस्तव सदस्य सचिवांनी प्रस्तावित केले.

(xiv) Registering forest offence through online by using PDA

(xv) Preparing polygon and monitoring of plantations and other related work by using PDA, GPS etc.

(xvi) Monitoring forest fire and put off fire by receiving fire alerts using PDA / Smart phone.

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कार्या-१४



Scanned by CamScanner

(xvii) Monitoring of plantations, forest protection, wildlife by using GPS and anroid app such as MSTRIPES etc.

(xviii) Monitoring of wildlife by using camera trap, observation during patrolling.

(xix) Dealing with Man and Wild animal conflict.

(xx) Maintain law and order situation while with Man and Wild animal conflict cases, doing Rapid Rescue Operation, arresting the wild animals as per order, follow the wild animals using caller id, monitoring of wild animals using advanced technology.

(xxi) Implementation of Forest development and Forest conservation works in participation of public from nearby villages through new policies of Government such as Joint Forest Management, Eco developmement etc.

(xxii) Preparing micro-plan and implementing the plan at village level, creating employment through Joint Forest Management, Biodiversity Committee etc.

(xxiii) Handling new schemes of Government from time to time.

(xxiv) Manage accounts of grant received to Village Forest Committee, Joint Forest Management Committee, Eco-development Commitee, Biodiversity Committee etc.

४. वरील मुद्दांवर उपस्थित सर्व सदस्यांनी चर्चा केली. त्यानुसार वनरक्षक व वनपालांचे कर्तव्य जे महाराष्ट्र वन संहिता भाग-१मध्ये दिलेल्या आहेत त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्यांचे कर्तव्याचा भाग असलेले जसे रोपवन करणे, आगीपासून बचाव करणे, वनगुन्हा नोंदविणे इत्यादी कामे करण्यासाठी पीडीए, जीपीस इत्यादी नवीन व आधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. मुळात वनरक्षक व वनपालांचे कर्तव्यात बदल झालेला नसून त्यांची कर्तव्ये ही आधुनिक तंत्रज्ञानाचे माध्यतातून करावयाची आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे उलट त्यांची कामे आणखी सोपी व सोयीस्कर झाली आहे. तसेच तंत्रज्ञान हे सतत बदल राहणार असल्याने अशा तंत्रज्ञानाचा वापर करणेची बाब कर्तव्यात समाविष्ट करणे योग्य होणार नाही, असे मा. अध्यक्षाची मत नोंदविले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

५. वनविभागात तंत्रज्ञानाचा वापर करणेबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय / परिपत्रक निर्गमित करुन सुचना दिलेल्या आहे. शासन, महसूल व वनविभाग निर्णय क्र. एमएससी-२००४/प्र.क्र.२१/फ-२, दिनांक ०५/१०/२०११ नुसार संपूर्ण आय.टी. प्रकल्प वनविभागाचे क्षेत्रीय अधिकारी, वनक्षेत्रपाल व वनरक्षकापर्यंत राबविण्याचे शासनाचे आदेश आहेत. तसेच शासन, महसूल व वनविभाग निर्णय एमएससी२००४/प्र.क्र.२१(भाग-३)/फ-२, दिनांक ०४ ऑगष्ट २०१४ अन्वये सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी, सर्व वनपाल व वनरक्षक यांना PDA / Smart Phone देणेबाबत शासनाने निर्णय घेतला असून वापर सतत व नियमितपणे करणेबाबत शासनाच्या सुचना आहेत. वरीष्ठांच्या / शासनाच्या सुचनांचे पालन करणे हे प्रत्येक शासकीय कर्मचा-याचे कर्तव्य असून त्यामध्ये त्याने कसूर केल्यास तो महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत कारवाईस पात्र राहील. त्यामुळे कोणताही कर्मचारी हा शासनाच्या / वरीष्ठांच्या सुचना असल्यास तंत्रज्ञानाचा वापर करण्यास नकार देऊ शकत नाही.



जन माहिती अधिकारी तथा ... अधिकारी ... १०

Scanned by CamScanner

फक्त काही वनरक्षकांनी पीडीए, जीपीएस इत्यादीचा वापर करण्यास नकार दिला म्हणून वनरक्षकाचे कर्तव्यात बदल करणे योग्य होणार नाही, असे मत मा. अध्यक्षांनी नोंदविले. तसेच याबाबत सर्वसाधारण सुचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना निर्गमित करणे पुरेशे होईल. त्यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

६. समितीच्या कार्यक्षेत्रात नसली तरी मा. अध्यक्षांनी असे मत नोंदविले की, वनरक्षक पदाचे कर्तव्य व जबाबदा-या विचारात घेता सदर पदाचे सेवाप्रवेश नियमात पदाची शैक्षणिक अर्हता ही विज्ञान शाखेची असावी.

७. **समितीची शिफारस :-** महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-।) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये दिलेल्या वनरक्षक वनपालांचे कर्तव्यात आजच्या घडीला कोणताही बदल झालेला नाही. फक्त काम करण्याचे माध्यमात बदल झालेला आहे. आधुनिक तंत्रज्ञानात बदल ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे व त्यानुसार कर्मचा-यांनी काम करणे अभिप्रेत आहे. त्याचा अंतर्भाव कर्तव्यात करणे अपेक्षित नाही. शासनाच्या / वरीष्ठांच्या सुचना असताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरास कोणीही नकार देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-।) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये दिलेल्या वनरक्षक वनपालांचे कर्तव्यात बदल करण्याची गरज नाही, अशी समितीची शिफारस आहे.

(ए.एच. भगत)
वन अभियंता, नागपूर
तथा सदस्य

(डी.डी. गुजेला)
मुख्य वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन)
नागपूर तथा सदस्य सचिव

05/03/18
(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नागपूर तथा सदस्य

(प्रवीण श्रीवास्तव)
(प्र. पी. श्रीवास्तव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(माहिती तंत्रज्ञान व धोरण)
महाराष्ट्र राज्य, नागपूर
तथा अध्यक्ष

जन माहिती अधिकारी
तथा
कक्ष अधिकारी कक्ष-१०



Scanned by CamScanner

.... नागपूर यांचे कार्यालय

(२३)

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर, ४४० ००१

**आदेश**

क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.८७(१६-१७)/२२६३
नागपूर-४४० ००१ दिनांक १६-२-२०१८

**विषय :** वनरक्षक व वनपालांचे कर्तव्यात सुधारणा करणेबाबत

वनरक्षक व वनपालांची कर्तव्ये ही महाराष्ट्र वन संहिता (व्हॉल्यूम-१) चे प्रकरण २ चे परिच्छेद २.०५.०४ व २.०५.०५ मध्ये दिलेली आहेत. तथापी बदलल्या काळानुसार वनरक्षक व वनपालांचे कामात बराच बदल झाला असून त्यांचे कर्तव्य व जबाबदा-यात वाढ झाली आहे. त्यानुसार वनरक्षक व वनपालांचे कर्तव्याबाबत असलेल्या तरतूदीत सुधारणा करणे आवश्यक आहे. या सुधारणेबाबत शिफारस करणेकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), महाराष्ट्र राज्य, नागपूर :- अध्यक्ष
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर :- सदस्य
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर :- सदस्य
४) वन अभियंता, नागपूर :- सदस्य
५) मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन), नागपूर :- सदस्य सचिव

तरी उपरोक्त समितीने त्यांचा अहवाल १५ दिवसात सादर करावा.

(ए.आर. मंडे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

१६-२-१८

प्रति,
१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण), म.रा., नागपूर
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा., नागपूर
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
४) मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन), नागपूर
५) वन अभियंता, नागपूर

जन माहिती अधिकारी
तथा
कक्ष अधिकारी कक्ष-१०



Scanned by CamScanner